# प्रेसनोट

महावितरण कार्यालय कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील लोकसेवक श्री. जाधव, उप कार्यकारी अभियंता यांनी लाचेची मागणी केल्याने त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | कुडाळ |
| पोलीस ठाणे | कुडाळ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. विजय नरसिंग जाधव, उप कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. वर्ग-२. |
| मागणी केलेली लाच रक्कम | ५,०००/- रूपये |

**थोडक्यात हकीगत:-**

यातील तक्रारदार हे अल्पी पोलराइज्ड टेकसोल प्रायवेट लिमीटेड कंपनीव्दारे सोलरचे काम करतात. तक्रारदार यांनी श्री.लक्ष्मण साखाराम धुरी यांचे सोलरचे काम घेतलेले असुन, सोलर फिटींग केल्यानंतर त्यास कनेक्शन देण्याचे काम महावितरण ऑफीस, कुडाळ मधील श्री जाधव यांचेकडे होते. श्री. जाधव यांनी सदर कागदपत्रावर तसेच चेकलिस्ट वर सही करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रू. लाचेची मागणी केल्याने तक्रारदार श्री. राणे यांनी पोनि/श्री. मनोज जिरगे, ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग यांचेकडे दि. ०५/०५/२०२५ रोजी लेखी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०६/०५/२०२५ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लोकसेवक श्री. जाधव यांची लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता श्री. जाधव यांनी तक्रारदार श्री. राणे यांचेकडे ५,०००/- रू. लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले असल्याचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषणावरून आढळुन आल्याने लोकसेवक श्री. जाधव यांचेविरूध्द आज दि. २०/०५/२०२५ रोजी कुडाळ पोलीस ठाणे गु.र.नं. १६६/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ संशोधन २०१८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील कारवाई श्री. अरूण पवार, पोलीस उपअधीक्षक, ॲसीबी सिंधुदुर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. मनोज जिरगे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदूर्ग यांचेकडून करण्यात आलेली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेशी संपर्क करावा.**

---

**मार्गदर्शन अधिकारी- मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**
**मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि ठाणे परिक्षेत्र ठाणे**

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. सिंधुदुर्ग, कुडाळ तहसीलदार कार्यालयासमोर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, (४१६५२०)
संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- dyspacbsindhudurga@gmail.com
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री नंबर :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२३६२-२२२२८९

(मनोज जिरगे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग

Scanned with CamScanner